ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११ वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ माघ शके १९४७, बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

शासकीय रुग्णालयातील मोफत सेवा बंद होणार?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

जनतेला गुणवत्तापूर्ण, मोफत किंवा अल्प दरात आरोग्य सेवा पुरवणे हे सरकारचे घटनात्मक व प्राथमिक कर्तव्य आहे. याद्वारे आजार रोखणे, रुग्णालये, चाचणी सुविधा, औषधे आणि आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देऊन सर्वसामान्यांचा जगण्याचा अधिकार सुरक्षित केला जातो. याद्वारे नागरिकांचे कल्याण साधणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट असते. मात्र आता सरकार जनतेच्या आरोग्य सेवांवर शासकीय रुग्णालयात शुल्क आकारणार असल्याची बातमी समोर आली आहे.

आरोग्य विभागाने विविध वैद्यकीय सेवांसाठी निश्चित शुल्क आकारण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. मागील काही वर्षांपासून अनेक सेवा पूर्णपणे मोफत दिल्या जात होत्या; मात्र आता काही तपासण्या, उपचार आणि शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना ठराविक रक्कम भरावी लागणार आहे..१६ जानेवारी रोजी राज्य शासनाने यासंबंधी अधिकृत आदेश काढला आहे. या निर्णयात केसपेपर, तपासण्या आणि काही उपचारांसाठी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण तसेच महिला रुग्णालयांमध्ये हे नियम लागू राहणार आहेत. अंमलबजावणी नेमकी कधी सुरू होईल याबाबत स्पष्टता नसली तरी रुग्णालय प्रशासन तयारीला लागल्याची माहिती आहे.

लोकशाहीत, विशेषतः भारत सरकारच्या धोरणांनुसार, ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिकाला (विशेषतः गरीब व वंचितांना) आरोग्य सेवा देणे हे सरकारचे मुख्य कार्य आहे, ज्यासाठी सरकारी रुग्णालये आणि आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. आरोग्यामध्ये सरकारची भूमिका केवळ उपचार करणे नसून, प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संपूर्ण लोकसंख्येचे स्वास्थ्य जपून त्यांना निरोगी जीवन देणे हे आहे. मात्र आता सरकार शासकीय रुग्णालयातून मोफत उपचार देणार नसल्याने गोर गरीब रुग्णांची उपचार कुठे घ्यायचा हा प्रश्न निर्माण होणार आहे. खाजगी इस्पितळात उपचार घेणे सर्वसाधारण रुग्णांना परवडणारे नसून गरीब रुग्णांची अजूनच आर्थिक पिळवणूक होणार आहे. पैशाने अभावी वेळेवर उपचार न मिळाल्यास रुग्ण दगावण्याची देखील भीती व्यक्त केली जात आहे.आधीच शासकीय रुग्णालय व्हेंटिलेटरवर आहे.शासकीय रुग्णालयांमधील व्हेंटिलेटर सुविधेची अवस्था गंभीर असून अनेक ठिकाणी तांत्रिक त्रुटी, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, आणि देखभालीअभावी हे यंत्र शोभेची वस्तू बनले आहेत पीएम केअर्स अंतर्गत पुरवलेले व्हेंटिलेटर निकामी असल्याचे रिपोर्ट असून,

काही ठिकाणी देखभाल दुरुस्तीअभावी रुग्णांना गैरसोयीचा सामना करावा लागतो.

शासकीय रुग्णालयांमध्ये उत्तम दर्जाचे आरोग्य सुविधा मोफत किंवा अनुदानित दरात उपलब्ध असले तरी, या तांत्रिक समस्यांमुळे आपत्कालीन स्थितीत रुग्णांना व्हेंटिलेटरची सोय मिळणे कठीण होत आहे.शासकीय रुग्णालयाची ही दैन्यावस्था असताना आता शुल्क आकारण्याचे सरकारचे ठरविल्याने गरीब रुग्णांना मोफत उपचार मिळणार असल्याने हा वर्ग वैद्यकीय उपचारापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील विविध वैद्यकीय सेवांसाठी सरकारने नुकतेच दर निश्चित केले आहेत. ओपीडी केसपेपर नोंदणीसाठी ५ रुपये ,तर सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ४० हजार रुपये आकारले जाणार आहेत. शासन निर्णयानुसार, रुग्णालयात दाखल रुग्णांना दररोज १० रुपये प्रवेश शुल्क द्यावे लागेल. हिमोग्लोबिन, टीएलसी, डीएलसी, रक्तगट व आरएच तपासणी, लघवीच्या रासायनिक चाचण्या, कल्चर-सेंसिटिव्हिटी अशा प्रत्येक रक्ततपासणीसाठी रुपये आकारले जातील. मूत्रपिंड व मूत्राशय तपासणीसाठीची इंट्राव्हेनस पायलोग्राम एक्स-रे प्रतिस्कॅन १०० रुपये, डोक्याचा सीटी स्कॅन ३०० रुपये, तर मणका, मान व छातीचा सीटी स्कॅन ४०० रुपये असेल. भूल देऊन करण्यात येणाऱ्या लहान-मोठ्या शस्त्रक्रियांकरिता ६०ते १६० रुपये आकारले जातील. एमआरआय स्कॅनसाठी १,६००रुपये मोजावे लागतील.जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि महिला रुग्णालयांमध्ये हे दर लागू होणार आहेत. त्यामुळे मोफत उपचारांच्या निर्णयाला पूर्णविराम मिळणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासन निर्णयातील शुल्क कागदावर कमी वाटत असले तरी शासकीय रुग्णालयांत येणारे बहुतांश रुग्ण समाजातील अत्यंत दुर्बल घटकांतील असतात. त्यामुळे त्यांना उपचारांसाठी पैसे आकारले तर ते अडथळा ठरतो. जीआरनुसार खासदार, आमदार आणि न्यायाधीशांसाठी मोफत उपचार आहे, ते प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयांत उपचार घेतच नाहीत. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करावा. शासकीय रुग्णालयांत आरोग्यसेवा पूर्णपणे मोफत असावी.

''संघ प्रवासाची १०० वर्षे, नवे क्षितीज''

संघामुळे भाजपला 'अच्छे दिन', भाजपसह संघप्रणित संघटनांच्या पापात थोडा वाटा आमचाही, सरसंघचालक मोहन भागवत यांचे परखड प्रतिपादन

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

मुंबई : भाजप सत्तेत असल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला चांगले दिवस (अच्छे दिन) नसून संघामुळे भाजपला 'अच्छे दिन' असल्याचे परखड प्रतिपादन सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी येथे केले. भाजपसह संघप्रणित संघटनांनी आपल्या कार्यातून कमावलेले पुण्य त्यांचेच आहे, मात्र या संघटनांमध्ये संघातून गेलेले कार्यकर्ते असल्याने त्यांच्या पापाचा थोडा वाटा आमच्याकडे येतो व आम्ही तो स्वीकारतो, असे भागवत यांनी स्पष्ट केले.

भागवत यांनी 'संघ प्रवासाची १०० वर्षे, नवे क्षितीज ', या विषयावर वरळीतील नेहरु सेंटरमध्ये शनिवार व रविवारी विस्तृतपणे उहापोह केला. संघ समजून कसा घ्यावा, संघाचा विचार, कार्यपद्धती काय, आदी मुद्द्यांवर विवेचन केले आणि भाजप-संघ संबंध यासह राजकारण, समाजकारण, जातीव्यवस्था, अनुसूचित जाती-जमातीची व्यक्ती सरसंघचालक होवू शकते का, यासह अनेक प्रश्नांना परखड उत्तरे दिली.

भाजपमुळे संघाला अच्छे दिन आहेत का, भ्रष्टाचारी व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नेत्यांना भाजपकडून प्रवेश

दिला जात असताना संघ त्यांच्यावर दबाव का टाकत नाही, आदी प्रश्नांवर भागवत म्हणाले, भाजपमुळे संघाला अच्छे दिन नसून त्याच्या उलट परिस्थिती आहे, संघामुळे भाजपला अच्छे दिन आहेत. आम्ही कोणासाठीही काम करीत नसून आमची नीती, विचार व ध्येयासाठी काम करतो. आमची नीती व विचार जे स्वीकारतात, त्यांना लाभ होतो. आम्ही अयोध्येतील राममंदिराच्या बाजूने भूमिका घेतली. ज्यांनी ती नीती स्वीकारली, त्यांचा लाभ झाला. आणीबाणीला विरोध, राम जन्मभूमी आदी आंदोलने आणि संघाच्या कार्यकर्त्यांचे परिश्रम यामुळे संघटनेचा पाया वाढला व लोकांचा विश्वास मिळाला, त्यामुळे आमचे 'अच्छे दिन ' आले आहेत, असे भागवत यांनी स्पष्ट केले.

भाजप, विश्व हिंदू परिषद, अभाविप, मजदूर संघ, किसान संघ या संघप्रणित संघटना असून संघाचे कार्यकर्ते त्यात आहेत. ते प्रभावीही आहेत. पण त्या संघाच्या शाखा नसून या संघटना स्वायत्त, स्वतंत्र व स्वावलंबी आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र व कार्यपद्धती स्वतंत्र आहे. राजकारण सिद्धांतावर असावे आणि विचार असावा, असे संघाचे मत आहे. पण आम्ही कोणावर दबाव टाकत नाही. आम्हाला कोणी सल्ला मागितला, तर सर्वांना देतो. धोका दाखवून देतो. ज्याप्रमाणे कुटुंबातील पाच भावांचे स्वतंत्र व्यवसाय असल्यास ते कुटुंब म्हणून एकत्र असतात, पण एकमेकांच्या व्यवसायात लुडबुड करीत नाहीत, त्याप्रमाणे आमचीही कार्यपद्धती आहे. भाजपसह अन्य संस्थांनी आपल्या कार्यातून कमावलेले पुण्य त्यांचे असते, पण पापात मात्र थोडा वाटा आमचा असतो. या संघटनांमध्ये संघातून गेलेले कार्यकर्ते असल्याने पापाचा काही वाटा आमच्याकडे येतो, त्याला काही इलाज नाही. ती आमची जबाबदारी (रिस्क) आहे.

राजकारणावर संघाचा दबाव नसतो, तो मतदारांचा असतो. घेतो. सिद्धांतहीन राजकारण चालते, म्हणून राजकीय पक्षांकडून ते केले जाते. राजकारण हे आज केवळ मतांसाठी होत असून समाजाने नैतिकता जोपासली पाहिजे. तसे झाले, तर राजकारण विचारांवर चालेल, असे भागवत यांनी नमूद केले. राजकारणात जातीपाती, धर्म आदी बाबींचा विचार केला जातो. पण मतदार किंवा समाजाकडून जातीपातीचा विचार केला जात असल्याने तो राजकीय नेत्यांकडून केला जातो. जर समाजाने जातीपातीचा विचार सोडला, तर निवडणुकीच्या राजकारणातूनही जातीपाती हद्दपार होतील, असे मत भागवत यांनी व्यक्त केले.

देशाच्या राज्यघटनेने दिलेले आरक्षण योग्यच असून अनेक वर्षे अत्याचार सहन केलेल्या आणि दुर्लक्षित राहिलेल्या समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे, अशीच संघाची कायम भूमिका राहिली आहे. या समाजाचे पुनरुत्थान करण्यासाठी मदत व सहकार्याची गरज असून इतरांनी थोडा त्याग केला पाहिजे. जातीपाती, धर्म विसरुन आपल्या दैनंदिन जीवनात वागले पाहिजे. जेव्हा आपण समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झालो आहोत आणि सक्षम झालो आहोत, असे या आरक्षण मिळत असलेल्या वर्गाला वाटेल, तेव्हा आता आरक्षणाची गरज उरलेली नाही, असे त्यांच्याकडून सांगितले जाईल. तोपर्यंत काही वर्षे वाट पाहिली पाहिजे, असेही भागवत यांनी नमूद केले. स्वा.सावरकरांना ' भारतरत्न ' दिल्यास तो पुरस्काराचा गौरव ठरेल, असे प्रतिपादन करीत भागवत यांनी सावरकरांना हा पुरस्कार देण्याच्या मागणीचे ठामपणे समर्थन केले. सावरकरांचे स्थान अतिशय वरचे आहे. हा पुरस्कार देण्यासंदर्भातील समितीमध्ये मी नाही. पण जे आहेत, त्यांना यासंदर्भातील भावना कळविल्या जातील, असे भागवत यांनी नमूद केले.

आनंदयात्री रवींद्रनाथ : एक बहुआयामी महामानवाचा प्रेरणादायी प्रवास !

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

मुखपृष्ठ आणि प्रस्तावना: साजेसे आणि बोलके

पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत आकर्षक आहे. रवींद्रनाथ टागोरांचा गूढ, गहन तरीही शांत आणि निश्चयी भाव दर्शवणारा फोटो आणि त्यासोबत दिलेले एकला चलो रे हे ब्रीदवाक्य अतिशय अर्थपूर्ण वाटते. मलपृष्ठावरील मांडणी आणि प्रस्तावनेतील वेचक वाक्ये पुस्तकाच्या व्यापकतेची प्रचिती देतात. पुस्तकातील अर्पणपत्रिका दोन आनंदयात्रींना समर्पित असून, लेखकाच्या मनोगतातून त्यांचा प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता भाव जाणवतो. मा. डॉ. नरेंद्र जाधव यांची सुलभ भाषेतील प्रस्तावना या पुस्तकाचे महत्त्व अधिक अधोरेखित करते.

पुस्तकाची अनुक्रमणिका केवळ प्रकरणांची यादी नसून ती टागोरांच्या विविध पैलूंचे दर्शन घडवणारी जणू एक चित्रफीत आहे. एकूण ४० लेखांमधून लेखकाने टागोरांचे वेगळेपण मांडले आहे.



कौटुंबिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी सांगताना रवींद्रनाथ कसे घडले? त्यांच्यावर कोणते संस्कार झाले? हे लेखकाने प्रभावीपणे मांडले आहे. नव्याचा स्वीकार आणि जुन्याचा त्याग हा डोळस विवेक त्यांच्या कुटुंबात कसा होता, हे वाचणे रंजक आहे.

शिक्षणतज्ज्ञ रवींद्रनाथ मांडताना निसर्गाच्या सानिध्यात शिक्षण देणारी शांतिनिकेतनची संकल्पना, मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व आणि आनंददायी शिक्षण या विषयांवरील त्यांचे विचार आजही तितकेच सुसंगत वाटतात. पालकांसाठी हा भाग मार्गदर्शक आहे.

टागोर यांना साहित्याचा महासागर म्हंटले आहे.

लेखकाने टागोरांच्या साहित्यिक प्रवासाचा अत्यंत सूक्ष्म आढावा घेतला आहे.

टागोर यांचे अष्टपैलू साहित्यिक हे व्यक्तिविशेष सांगताना नाटककार, कथाकार आणि कादंबरीकार म्हणून त्यांची अचंबित झेप कशी आहे ते विषद केले आहे. विशेषतः स्त्री-प्रधान कथांमधील भावनाविश्व आणि नष्टनीड सारखी संयमित कथा वाचकाला अंतर्मुख करते.

विश्वकवी म्हणून संबोधताना जन गण मन या राष्ट्रगीतामागील रोचक इतिहास आणि साहित्यातील नोबेल पारितोषिक मिळवून देणाऱ्या गीतांजली या काव्यसंग्रहावर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

कलाविष्कार: चित्रकला, संगीत (रवींद्र संगीत) आणि नृत्य या क्षेत्रांत त्यांनी वयाच्या उत्तरार्धात केलेले प्रयोग त्यांच्यातील चिरतरुण ऊर्जेची साक्ष देतात. ''शब्द मला संतुष्ट करत नाहीत, माझ्या रेषा मात्र हसतात'' हे त्यांचे चित्रकलेबद्दलचे विधान खूप काही सांगून जाते.

माणुसकीचा धर्म आणि जागतिक विचार

टागोरांचे राजकीय विचार, त्यांची मानवतावादी दृष्टी आणि श्रीनिकेतनच्या माध्यमातून त्यांनी केलेले ग्रामीण विकासाचे कार्य लेखकाने कर्मयोगी रवींद्रनाथ या प्रकरणात उत्तमरित्या मांडले आहे. ''अवघे जग एक कुटुंब व्हावे'' ही त्यांची वैश्विक भावना पुस्तकातून ओतप्रोत वाहते.

पुस्तकाचे वेगळेपण

या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वी लेखमालेवर आलेल्या मान्यवर वाचकांच्या प्रतिक्रिया आणि शेवटी दिलेली संदर्भग्रंथ सूची. यामुळे पुस्तकाची विश्वासार्हता आणि उंची वाढली आहे.

थोडक्यात सांगायचे तर...

आनंदयात्री रवींद्रनाथ हे केवळ एक चरित्र नसून तो मानवी मूल्यांचा आणि कलात्मक प्रवासाचा एक अनमोल ठेवा आहे. रवींद्रनाथांना नव्याने भेटण्यासाठी हे पुस्तक प्रत्येकाच्या संग्रही असायलाच हवे.

विशेष संधी: हे पुस्तक तुम्ही थेट लेखक श्री. विश्वास देशपांडे यांच्याकडून त्यांच्या स्वाक्षरीसह मिळवू शकता. त्यासाठी लेखकांशी आजच संपर्क साधा!

लेखक: श्री. विश्वास देशपांडे
प्रकाशक: सोहम क्रिएशन
पृष्ठ संख्या: २१२ किंमत: ३००/-

जात्यावरच्या ओव्या.....

राज्याहुन राजा
राजा शिवबा शोभला
गोरगरीबाच्या साठी
देव धरतीवर आला || ४९२||

आडाच्या पाण्याची
चव लागतीया गोड
किती तहानले जीव
विसावले इथं थोड ||४९३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

समर्थ रामदास आणि श्रीराम

ज्योतिर्मय साहित्य

समर्थ रामदास आणि श्रीराम यांचं नातं म्हणजे दुधात विरघळलेली साखर. वेगळं करता येणं शक्यच नाही. श्रीराम म्हणजे समर्थांचा श्वास आणि ध्यास. हा श्रीरामाचा ध्यास घेऊनच समर्थांनी अगदी बालवयातच घर सोडले.

रामा तुजकारणे । जिवलगांचा संग सोडला

असे समर्थ सांगतात. समर्थांना रामाचा जो ध्यास लागला होता, तो एकाएकी निश्चितच नव्हता. समर्थांच्या घरात गेल्या २२ पिढ्यांपासून श्रीरामांची उपासना चालत आली होती. त्याची पूर्वपुण्याई सूर्याजीपंत ठोसर आणि राणूबाई यांच्या पोटी जन्म घेतलेल्या नारायणाच्या पाठीशी होती. समर्थांचा जन्मही चैत्र शुद्ध नवमीच्या दिवशी म्हणजे रामनवमीला झाला. याला केवळ योगायोग म्हणता येणार नाही तर समर्थांच्या हातून पुढे जे धर्मरक्षणाचे आणि रामाच्या उपासनेचे कार्य व्हायचे होते त्याचा हा एक दैवी संकेत होता. श्रीरामांच्या भेटीचा ध्यास घेतलेल्या नारायणाने नाशिकजवळील टाकळीस रामनामाचे पुरश्चरण सुरू केले. बालवयातच पाण्यात उभे राहून त्यांनी कठोर साधना केली आणि प्रत्यक्ष रामरायांचे दर्शन त्यांना घडले. श्रीराम हेच त्यांचे गुरु होते. ते स्वतःला या रामाचा दास म्हणवून घेत. ते म्हणत असत

साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ ।
श्रीगुरु श्रीरामसमर्थ । काय उणें दासासी ।।

वेदाध्ययन, विविध ग्रंथांचे अध्ययन, मंदिरातील पुराणश्रवण आदी गोष्टी तर त्यांनी या काळात केल्याच पण सूर्यनमस्कार घालून उत्तम आरोग्य संपादन केले. व्यायाम, उपासना आणि अध्ययन या तिन्ही गोष्टींना समर्थांच्या जीवनात महत्वाचे स्थान होते.समर्थांचे भाग्य एवढे थोर की साक्षात प्रभू रामचंद्राकडून त्यांना मंत्रदीक्षा मिळाली होती. त्यामुळे साहजिकच श्रीराम हेच त्यांचे आराध्यदैवत होते. कुटुंबात रामोपासनेची परंपरा होतीच.

त्यानंतर समर्थांनी भारतभ्रमण केले. अवघ्या भारतवर्षाची पायी तीर्थयात्रा त्यांनी केली. या यात्रेत त्यांना जे भारतदर्शन घडले, त्याचा मोठाच परिणाम समर्थांच्या मनावर झाला. त्यांना भारतातील विदारक परिस्थितीचे दर्शन झाले. भारतातील लोक दारिद्र्याने पिचले होते. अंगात गुलामगिरीची वृत्ती भिनली होती. लोक स्वत्व, स्वाभिमान आणि स्वधर्म विसरले होते. मोगली सत्ता क्रूर, अन्यायी आणि अत्याचारी होती. तिला विरोध करण्याचे लोक जणू विसरूनच गेले होते. धर्म बुडाला होता. मंदिरे नष्ट होत होती. मूर्तींची विटंबना होत होती.

स्त्रियांचे तर अनन्वित हाल होते. स्त्रिया सुरक्षित नव्हत्या. त्या अन्याय, अत्याचाराच्या बळी ठरत होत्या. त्यांचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य असलेली मनगटे कमजोर पडली होती. आपल्या दुर्दैवाचे दशावतार पाहण्यापलीकडे सामान्य जनता दुसरे काहीही करू शकत नव्हती. ही भयंकर परिस्थिती समर्थ रामदासांना विषण्ण करून गेली. **(क्रमशः)**





दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

बध्दमुक्तनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

(दशक ७ समास ६)

आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचार करावा लागतो. तो विचार शब्दांत मांडता यावा लागतो. त्यासाठी ग्रंथाचे वाचश मनन चिंतन करावे लागते. चूक असेल तर ते सोडून द्यावे लागते. कारण चुकीच्या गोष्टींना वेद, ऊपनिषदामध्ये अजिबात थारा नाही. सतत सत्याश्रयाचा आधार घ्यावा. विषय समजून देण्यासाठी चराचर विश्व शोधून योग्य द्रुष्टांत द्यावे लागतात. मी दासबोधाचे लिखाण करण्यासाठी प्रा.के.वी. बेलसरे सरांचा दासबोध संदर्भ ग्रंथ घेतला आहे त्यासाठी मी मा, बेलसरे सरांची शतशः ऋणी आहे.

आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचारांची बैठक तयार असलीच पाहिजे. मुक्त पुरूष अध्यात्म विषय सांगताना क्षणभर ब्रम्हाकार होतो. थोडावेळ आपल्या अवतीभोवती च्या जगाला विसरतो. विश्व शोधतो आणि आपले लिखाण अनेक योग्य उचित द्रुष्टांतांनी सहजसुंदर बनवतो. स्वतः शुकाने एवढा मोठ्ठा भागवत ग्रंथ सांगितला त्याच्या जवळ ब्रम्हाचे ज्ञान होते.

थोडक्यात काय तर नुसते रात्रंदिन पडून न रहाता चालता बोलता व्यवहार करता, सद्गुरूंच्या विचारसरणींवर जीवनातील कर्मे केली, त्यांच्या ज्ञानकलेवर चालले तर सायुज्यमुक्ति प्राप्त होऊ शकते.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

कर्तव्य करावे, मग व्हायचे ते होऊ द्यावे.

ज्योतिर्मय साहित्य

जगामध्ये आणि जीवनामध्ये दुःख आहे यात शंका नाही. पण त्यापैकी पंचवीस टक्के दुःखच बाहेरून येते. युद्ध, महागाई, दुष्काळ, चोऱ्यामाऱ्या, दारिद्र्य इत्यादींचे दुःख बाहेरून येते. पण पंचाहत्तर टक्के आपले दुःख आपल्यामधूनच निर्माण होत असते. आपले शरीर, मन आणि हृदयस्थ भगवंत मिळून आपण बनतो. भगवंत आनंदरूप असल्याने तो दुःख निर्माण करू शकणारच नाही. देहाचा स्वभाव झिजणे, क्षीण होणे, असमर्थ होत जाणे हा असल्याने तो आपल्या मार्गाने जात असतो. तो दुःख निर्माण करू शकत नाही. जे जडच आहे ते सुखही देऊ शकत नाही आणि दुःखही निर्माण करू शकत नाही. उरले आपले मन. कुठेतरी चिकटणे हा मनाचा स्वभावधर्म असल्याने ज्याला ते चिकटते त्याचे गुणधर्म अंगिकारते. भक्ताचे मन भगवंताला चिकटते म्हणून त्याच्या मनातून दुःख निर्माण होऊच शकत नाही. ज्याचे मन देहाला चिकटते, त्याचे मन दुःख निर्माण करीत असले पाहिजे. भगवंताहून वेगळेपण आणि देहाशी एकपण, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देह लहान आहे, आकुंचित आहे, तात्पुरता आहे, सान्त आहे; तोच मी आहे अशा घट्ट भावनेने जिकडेतिकडे दोनपण दिसू लागते आणि त्यातून भयरूपी समंध साकार होतो आणि तो जीवाला छळतो. भगवंताच्या स्मरणात आनंदाची मस्ती भोगायला जन्मलेला माणूस, भयापोटी चिंता आणि चिंतेपायी दुःख निर्माण करतो. भगवंताने आपल्या संकल्पाने जग निर्मिले. त्यात घडणाऱ्या घटनांचा आराखडा त्या संकल्पातच असतो. कालचक्र जसे फिरते तशा घटना आकार घेत जातात. त्यात भगवंताचा हात असतो. त्याचा विसर पडला की आपण गोंधळून जातो, आणि आपली कल्पना भय निर्माण करते. भगवंत मला सांभाळणारा आहे ही वस्तुस्थिती आहे, कारण भगवंताने स्वत:तूनच हे जग निर्माण केले. आपण अंतर्यामी त्याच्या नामात गुंतून राहिलो, तर त्याचे साहाय्य कसे मिळते याचा अनुभव आपोआप येईल. भगवंत नामस्वरूप आहे, म्हणून त्याच्या नामात राहणाऱ्याला देहाचे काय होईल याचे भय उरत नाही.

आपल्या प्रयत्नाने जेवढ्या गोष्टी करता येतील तेवढ्या करा. त्या होतच असतात, प्रयत्नाने फक्त आपला हात लागतो. आपल्या मनासारखेच व्हावे असे म्हणणे म्हणजे ज्या होणाऱ्या गोष्टी आहेत त्या मी बदलाव्या, असे म्हणण्यासारखे आहे. त्या कधी बदलल्या जात नाहीत, आणि आपल्याला आनंद कधी मिळत नाही. म्हणून म्हणतो, रामावर निष्ठा ठेवावी. माझे कर्तव्य मी केले आहे ना ? ते करीत असताना मी अनीती, अधर्माने वागलो नाही ना ? आता जे व्हायचे ते होऊ दे; कुठे काळजी करा ! ही वृत्ती ठेवून जगात जो वागेल ना, तोच मनुष्य सुखी होईल.

देहाचा लगाम भगवंताच्या हातात द्यावा आणि नामस्मरणात मजेत दिवस घालवावे.

दररोजच्या छोट्याछोट्या सवयी आरोग्यावर मोठा परिणाम करू शकतात !

ज्योतिर्मय साहित्य

आपण अनेकदा काही गोष्टी सहजपणे करतोलघवी थांबवणं, अंथरुणावर मोबाईल ठेवणं, जेवताना पाणी गिळणं. पण यामागे शरीरावर होणारे दुष्परिणाम खूप गंभीर असू शकतात. आरोग्यविषयक वैज्ञानिक संशोधन आणि तज्ज्ञांच्या निरीक्षणातून सिद्ध झालेल्या अशा ८ घातक सवयी तुमच्या शरीरावर हळूहळू घात करतात, हे जाणून घ्या आणि वेळेत सावध व्हा !

लघवी थांबवणं : ही सवय किडनीवर ताण आणते. दीर्घकाळ लघवी रोखल्यास मूत्रपिंडात जंतुसंसर्ग होण्याचा धोका वाढतो. परिणामी, युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन () होऊ शकतो. विशेषतः महिलांनी ही सवय टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

सतत बोटं मोडणं : बोटं मोडताना जो आवाज होतो, तो बुडबुड्यांच्या फ टण्यामुळे असतो. परंतु ही सवय सातत्याने केल्यास सांध्यांभोवतीच्या स्नायूंवर ताण येतो. यामुळे भविष्यात सांधेदुखी किंवा वयापूर्वी सांधे झिजण्याचा धोका निर्माण होतो.

जेवताना भरपूर पाणी पिणं : अन्न खात असताना जास्त पाणी पिल्यास पचनरस विरळ होतात आणि पचनक्रिया मंदावते. त्यामुळे अन्न पचन नीट होत नाही, गॅसेस, अपचन, पोट फुगण्याची समस्या जाणवू शकते.

सतत सलग बसून राहणं : ऑफिसमध्ये किंवा घरी तासन् तास बसून राहणं आरोग्यास अत्यंत घातक आहे. यामुळे रक्तप्रवाह मंदावतो आणि शरीरात रक्ताच्या गाठी ( ) निर्माण होण्याचा धोका वाढतो, ज्याचा परिणाम थेट हृदयावर होतो.

फोन उशाखाली ठेवून झोपणं : मोबाईलमधून होणारे रेडिएशन मेंदूवर परिणाम करतात. झोपेच्या वेळेस फोन डोक्याजवळ ठेवल्यास झोपेची गुणवत्ता बिघडते, डोकेदुखी, मानसिक अस्वस्थता, आणि थकवा वाढतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

खूप गरम अन्न खाणं : खूप तापलेल्या अन्नाचा थेट संपर्क अन्ननलिकेशी होतो आणि त्यामुळे ती जळते. दीर्घकाळ ही सवय राहिल्यास अन्ननलिकेच्या पेशींमध्ये बदल होऊन कॅन्सरचा धोका निर्माण होतो.

कानात कापसाचे बड्स वापरणं : आपण समजतो तितके हे निरुपद्रवी नाहीत. वारंवार वापर केल्यास कानाच्या आतील भागाला इजा होते आणि ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते. यामुळे ऐकू येण्यात अडथळा निर्माण होतो.

पोटावर झोपणं : ही झोपेची चुकीची पद्धत असून त्यामुळे मणक्यावर अनावश्यक ताण येतो. पाठदुखी, मणक्याचा वेदना, झोपेत वळण घेण्यास त्रास अशा समस्या उद्भवू शकतात.

निष्कर्ष : हे सर्व मुद्दे लहान वाटले तरी त्यांच्या दुष्परिणाम खूप मोठे आणि दीर्घकालीन असतात. जर आपण आरोग्याकडे गांभीर्याने पाहत असाल, तर या सवयी आजच बदलवा आणि शरीरासोबत मनालाही स्वस्थ ठेवा.

***

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस पहिला

पुढे.....

आपणही प्रपंचात वेगवेगळे निश्चय करतोच ना ! मग तसे निश्चय परमार्थात का करीत नाहीत? ध्रुवचरित्र हे परमात्या विषयी निश्चयी होण्याचे शिकविते.आम्हाला या कथेतून कांहीतरी शिकता येईल. आपल्या अवती भोवती अनेक वृत्ती आहेत. कधी कोणीतरी आपणास मदत करील असे वाटते, पण तो करीत नाही. कधी अनोळखी व्यक्ती मदत करतो. मित्र कधी हिताचे सांगणार नाही तर कधी शत्रू हिताचे सांगेल. शकुनी, दुर्योधन आमचे अवती भोवतीच आहेत. हिरण्य म्हणजे सोने व अक्ष म्हणजे डोळा. म्हणजे ज्याचा सोन्यावर डोळा, तो हिरण्याक्ष. या अर्थाने आपण बहुतेक सारे हिरण्याक्षच आहोत. या चरित्रात पहिल्या नऊ स्कंधात आपण त्यातील कथानकात येणाऱ्या पात्रातून कोणते गुण घ्यावेत ते घेतले तर 10 व्या स्कंधात भगवंताचे चरित्र ऐकून आपणास आनंद मिळेल. आपण नुसते पुण्य कमवून चालणार नाही.आपले पुण्याचे गाठोडे घेऊन आपण जर स्वर्गात गेलो तर तिथे प्रत्येक गोष्टीत पुण्य खर्च पडते. पुण्य संपले की दुसऱ्या क्षणीच स्वर्गातून घालवून दिल्या जाते. आम्हाला "विषयी" भागाची श्रेष्ठता मिळवायची नाही. आम्हाला वैराग्य मिळवायचे आहे.

मी कथे पेक्षा त्यातील विचार विस्ताराने सांगेल. कुणी आत्म कल्याण साठी परमार्थ करीत असेल, कुणी सामाजिक सेवेसाठी परमार्थाचा विचार करीत असेल. तत्वज्ञानं जेव्हा साधन सांगते तेव्हा त्यास मानस शास्त्र म्हणतात. ते जेव्हा फळाची भाषा सांगते तेव्हा ते समाजशास्त्र होते.

हातात जप माळ, प्रदक्षिणा, तीर्थ यात्रा करणे, देवपुजेला परमार्थ म्हणावा काय? नाही. माळ सुटत नाही पण व्यवहारातील लक्ष ही सुटत नाही ना?.

परमार्थ म्हणजे नेमके काय? क्रमशः.....

लघु बोधकथा

बदलण्याची संधी

सरधोगा जिल्ह्यातील खुशाबनगर येथे दिवाण मदनगोपाल राहत असत. अनेक राजवाड्यांचे मालक असलेल्या मदनगोपाल यांना दारूचा मोठा शौक होता. विलायती दारूच्या अनेक पेट्या त्यांच्या घरी त्यांनी साठवून ठेवलेल्या होत्या. मदनगोपाल एकदा सुगंधित थंड खोलीत विश्रांती घेत पहुडले होते. रखरखत्या उन्हात एका तेजस्वी साधूने त्यांच्या खोलीत प्रवेश केला. दिवाणसाहेबांनी हात जोडून त्या साधूला स्थान ग्रहण करण्यास सांगितले. साधू महाराज म्हणाले,''दिवाणसाहेब, मी इथे आलो आहे ते तुमच्याकडून एक वचन घेण्यासाठी, बोला मला वचन देताल काय'' दिवाणजी म्हणाले,''तुम्ही जे मागताल ते जर माझ्याकडे उपलब्ध असेल तर निश्चित वचन देण्यास मी बांधिल असेन. साधू म्हणाले,'' तुमची सर्वात प्रिय वस्तू म्हणजे दारू तुम्ही सोडून द्याल एवढेच वचन मला द्या.'' मदनगोपाल पहिल्यांदा कचरले पण वचन पूर्ण करण्यासाठी ते तयार झाले. त्यांनी नोकरांना बोलावले व दारूच्या सगळया बाटल्या फोडून टाकायचा आदेश दिला. नोकरांनी साधूच्यादेखतच सर्व बाटल्या फोडून टाकल्या. साधूला आनंद वाटला, त्यांनी परत जाताना दिवाणसाहेबांकडून पुन्हा कधीही दारू पिणार नाही असे वचन घेतले व निघून गेले. साधू गेल्यावर एक नोकर दिवाणजीकडे आला व म्हणाला,''महाराज आजच्या रात्रीपुरती दारू मी एकेठिकाणी लपवून ठेवली आहे, आणू का'' दिवाणजींनी त्याला ती बाटली आणावयास सांगून नोकराने ती बाटली आणताच त्यांनी ती बाटलीही स्वत:च्या हाताने फोडली व आयुष्यात पुन्हा कधीच दारूला स्पर्श केला नाही. पुढे वृंदावनला जाऊन त्यांनी दीक्षा घेतली. मदनगोपाल यांच्या आयुष्याची दिशाच त्या एका प्रसंगामुळे बदलून गेली. पुढे श्रीकृष्णप्रेमात बुडालेल्या मदनगोपाल यांनी ''निमाईचंद'' हे उत्कृष्ट उर्दू पुस्तक लिहीले.

तात्पर्य– स्वत:ला बदलण्याची संधी मिळाल्यावर प्रत्येकाने त्याचा लाभ घेतला पाहिजे. कदाचित त्या संधीतूनच आपल्या आयुष्याला कलाटणी मिळून आयुष्याचे सोने घडू शकते.

कासार समाजाच्या वतीने सुषमा लोखंडे यांचा गौरव

ज्योतिर्मय साहित्य

नांदेड : ऑल इंडिया पोलीस क्रीडा स्पर्धांमध्ये केरळ कोची येथे आयोजित करण्यात आलेल्या बँटमेंटेन क्लस्टर यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातुन टेबल टेनिस या खेळात प्रतिनिधीत्व करणारी महिला हवालदार श्रीमती सुषमा लक्ष्मीकांत लोखंडे कासार मिक्स दुहेरी याप्रकारात खेळुन कास्य पदक प्राप्त करून विजयी झाल्याबद्दल त्यांचा नांदेडचे माजी महापौर मोहिनीताई येवनकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कासार समाजाचे कुलदैवत कालिकादेवी मंदिराचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विष्णुनगर येथील मंदिरात समाजातील विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या मान्यवरांचा स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

सुषमा लोखंडे या हिमायतनगर तालुक्यातील खडकी या गावातील आहेत. अत्यंत गरीब परिस्थितीत स्वतःच्या हिमतीवर त्या पोलीस खात्यात जॉईन झाल्या. प्रतिकूल परिस्थिती असताना स्वतःच्या कर्तुत्वावर त्यांनी ही मजल मारली आहे. हिमायतनगर येथील कांतराव दस्तुरकर यांच्या त्या कन्या आहेत. कासार समाजासाठी त्याचे काम भूषणावह आहे. त्यांचे कासार समाजाचे अध्यक्ष अशोकदादा लोखंडे, जैन कासार समाजाचे अध्यक्ष विजय कासार, मुदखेड येथील जैन मंदिराचे अध्यक्ष दत्तात्रय पेदे आदींनी अभिनंदन केले.

तसेच सचिन ढोके यांचे आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षकपदी प्रमोशन झाल्याबद्दल, निलेश भुजबळ (परभणी) पोलीस दलात उल्लेखनीय कार्य, चंद्रकांत खांडगोरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील श्री कालिका मातेच्या मंदिराचा इतिहास लिहिल्याबद्दल अध्यक्ष अशोकराव लोखंडे यांच्या हस्ते सत्कार झाला. जैन कासार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक आदमाने, लोखंडे, येवनकर, युवक मंडळ, महिला मंडळ आदींनी परिश्रम घेतले. ललिता श्यामकांत कुंभकर्ण यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला.

मार्केट कॅप्स

मित्रांनो म्युच्युअल फंडाचा विषय निघाला की त्यांचे प्रकार पण चर्चेत येतात...
लार्ज कॅप,मिड कॅप, स्मॉल कॅप इत्यादी इत्यादी.
हे मार्केट कॅप्स काय असतात असा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल..होय ना?
चला आज मार्केट कॅप म्हणजे काय ते जाणून घेऊया.
सेबीने (सेक्युरीटी अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) मार्केट लिस्टेड कंपन्यांचे तीन प्रकार केले आहेत.
हे प्रकार कंपनीच्या भांडवलाच्या आधारे केले आहेत.
सगळ्यात जास्त भांडवल असलेल्या कंपनीचा क्रमांक एक .. आणि त्या नंतर येणाऱ्या ९९ कंपन्या या लार्ज कॅप मधे असतात. म्हणजे भांडवल क्षमतेच्या दृष्टीने मोठ्या असलेल्या पहिल्या शंभर कंपन्या म्हणजे लार्ज कॅप कंपन्या.
या शंभर कंपन्यांच्या पुढे येणाऱ्या १५० कंपन्या म्हणजे मिड कॅप कंपन्या आणि या लार्ज आणि मिड कॅप मिळून २५० कंपन्यांच्या नंतर ज्या आहेत त्या स्मॉल कॅप कंपन्या.
अगदी शाळेत जसे जास्त मार्क्स घेणारे पहिले १० विद्यार्थी , नंतर मध्यम विद्यार्थी आणि उरलेले फक्त पास होऊ शकणारे विद्यार्थी अशी काल्पनिक गटवारी असते तशीच ही कंपन्यांची गटवारी.
क्रमशः .....

भारतीय मजदूर संघ (बीएमएस) यांचा १२ फेब्रुवारी रोजीच्या सार्वत्रिक संपात सहभाग नाही

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – भारतीय मजदूर संघ (बीएमएस) हे स्पष्टपणे जाहीर करीत आहे की, १२ फेब्रुवारी रोजी प्रस्तावित करण्यात आलेल्या सार्वत्रिक संपाला भारतीय मजदूर संघ ना पाठिंबा देणार आहे, ना त्यात सहभागी होणार आहे. हा संप काही केंद्रीय कामगार संघटना तसेच संयुक्त किसान मोर्चा यांनी पुकारलेला असून, तो राजकीय प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेला आहे.

भारतीय मजदूर संघाने सातत्याने ही भूमिका घेतली आहे की, चारही श्रम संहितांचे भारतीय मजदुर संघ स्वागत करीत आहे, मात्र त्यापैकी दोन श्रम संहितांमधील काही तरतुदींविषयी बीएमएसने आपल्या हरकती व चिंता व्यक्त केल्या आहेत. बीएमएसने स्पष्ट केले आहे की वेतन संहिता व सामाजिक सुरक्षा संहिता या ऐतिहासिक व क्रांतिकारी आहेत, तर उर्वरित दोन संहितांमधील काही तरतुदींविषयी संघटनेला चिंता आहेत.

या सर्व मुद्द्यांवर १३ व २१ नोव्हेंबर रोजी भारतीय मजदूर संघ व केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांच्यात झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.या चर्चेनंतर श्रममंत्र्यांनी बीएमएसने मांडलेल्या हरकतींवर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. अशी माहिती भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे व महामंत्री किरण मिलगीर यांनी दिली आहे.

याशिवाय,भारतीय मजदूर संघाने कामगार क्षेत्राशी संबंधित इतर अनेक मागण्या सरकारसमोर मांडल्या असून, त्या मागण्यांवरही योग्य प्रकारे विचार करून समाधान काढण्यात येईल,असे श्रममंत्र्यांनी आश्वस्त केले आहे.

या आश्वासनांच्या आधारे, भारतीय मजदूर संघाने चारही श्रम संहितांच्या अंमलबजावणीसंदर्भातील अधिसूचनांचे स्वागत केले आहे.

भारतीय मजदूर संघ सरकारच्या सकारात्मक व कामगारहितैषी धोरणांना सातत्याने पाठिंबा देत आला आहे,तसेच कामगारांच्या हितांच्या विरोधात असलेल्या धोरणांचा ठामपणे विरोध करून त्याबाबत आपल्या हरकती मांडत राहिला आहे.भारतीय मजदूर संघ राजकीय प्रेरणेतून होणाऱ्या आंदोलनांमध्ये सहभागी होत नाही, कारण कामगार क्षेत्राला राजकीय स्वार्थांपासून दूर ठेवणे आवश्यक आहे.

म्हणूनच, भारतीय मजदूर संघ व संलग्न संघटना १२ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या कोणत्याही संपाला पाठिंबा देणार नाहीत व त्यात सहभागी होणार नाहीत. अशी माहिती भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे व प्रसिद्धी प्रमुख सागर पवार यांनी दिली आहे.

मुक्त विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांसाठी बोली भाषा लेखन स्पर्धा आयोजित

नाशिक – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि संवाद पत्रिकेच्या वतीने विद्यापीठातील सर्व अध्ययनार्थींसाठी मराठी बोली भाषा लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा, संजीव सोनवणे यांच्या निर्देशानुसार मराठी भाषा पंधरवडा निमित्त आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांना येत्या दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत भाग घेता येईल.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक प्रदेश विभागाची आणि गावांची एक विशिष्ट बोली आहे, जिचा प्रभाव आपणास प्रमाणभाषेत बोलतानाही दिसून येतो. प्रामुख्याने अहिराणी, कोकणी, वऱ्हाडी, मालवणी, झाडीबोली, मराठवाडी, कोल्हापुरी, आग्री, वंजारी, चंदगडी, वाडवळी, खान्देशी आदी बोली भाषांचे जतन करण्याच्या हेतूने ही स्पर्धा आहे. त्यासाठी मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या जिल्ह्यातील किंवा प्रदेशातील बोली भाषेतील कथा, कविता, गाणी, लोकगीते, उखाणे आणि ओव्या इत्यादींचे लेखन पाठवायचे आहे. कथेसाठी ८०० ते १००० शब्दांची मर्यादा असून कविता, गाणी, लोकगीते, लोकनाट्य आणि उखाण्यांसाठी कोणतीही शब्दमर्यादा ठेवण्यात आलेली नाही. स्पर्धकांनी आपले साहित्य स्वतःचे आहे की इतरांचे संग्रहित आहे, याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. साहित्य टंकलिखित किंवा स्वअक्षरात लिहून त्याची पीडीएफ किंवा वर्ड फाईल सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत paikrao_vk@ycmou.digitaluniversity.ac या ईमेल पत्त्यावर पाठवावी. सोबत स्पर्धक विद्यार्थ्याने आपले पूर्ण नाव, शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्राचे नाव, केंद्र संकेतांक आणि कायम नोंदणी क्रमांक (पीआरएन) नमूद करणे बंधनकारक आहे.

मानसपूजा : सहज सुंदर राम अनुरागी

ज्योतिर्मय साहित्य

भगवंताची प्राप्ती करून घेणे हे मानवाचे अंतिम उद्दिष्ट आहे. सद्गुरू या साठी सतत कार्यरत असतात. भगवंताला काय अपेक्षित आहे हे ते पुन्हा पुन्हा पटवून देतात. कोणतेहि कष्ट न करता भगवद्प्राप्ती शक्य आहे. काहीही न करणे व आत्मस्वरूपात स्थिर रहाणे हेच खरे समाधान, सुख आहे. आपल्याच स्वरुपाला ओळखणे इतकी साधी गोष्ट सद्गुरू पटवत असतात. या जगाशी संबंध आहेच अमान्य नाही पण तो चिरकाल टिकणारा नाही हे पटवतात.

समर्पण व स्वीकार ह्या स्वानंदाच्या पायऱ्या आहेत. आपली सत्ता आपल्यावरच चालते व तीच चालवावी इतकं स्पष्ट पण गुह्य ज्ञान समजण्याची दिव्य दृष्टी सद्गुरू बहाल करतात व गुरु शिष्य एक होतात. मानसपूजेचा हा श्लोक बालपणापासून कानावर पडत होता हे सद्भाग्यच पण तो आचरणात आणण्याची इच्छा श्री सद्गुरू कृपेनेच शक्य होते.

या जगातील काहीच भगवंताला अपेक्षित नाही कारण तोच त्याचा कर्ता करविता आहे. त्याचीच वस्तू त्याला देणारे आपण कोण? सत्य हेच आहे. मी काय द्यावे तर जे माझे आहे. म्हणून ती मूर्ती माझ्या हृदयात स्थापित करणे मग ते जे सांगतील तेच मी करणे शक्य आहे व तीच मानसपूजा आहे. मी माझे ऐकणे इतकं कठीण असतं? होय मी फक्त इतरांशी बरोबरी करतच जगत असतो. आपल्याकडून काय अपेक्षित आहे हे बाहेर कसे शक्य आहे?

प्रत्येक ओळीत एकेक वस्तू आपलीच आपण अर्पण करायची. भावाचे गंध, भक्तिरुपी अक्षता, मन हाच मोगरा व चित्त ही शेवंती, स्वतः मी, माझे स्वत्व म्हणजेच तुळशी वहायच्यात. क्रोध, राग जाळून ज्ञानाचा प्रकाश उजळवून त्या प्रकाशात जे अविनाश रुप आहे ते पहाणे हा योग आहे. ते निर्लेप, निश्कलंक, शाश्वत, निर्मोही सर्वोत्तम स्वरुपात एकरूप होणे म्हणजे मानसपूजा होय.

साधने असतील तर उत्तमच पण नसतील तरी आपल्या स्वतः जवळ असलेली ही दैवी पूंजी त्याची त्याला समर्पित करणे म्हणजे खरी पूजा होय हे गुह्य ज्ञान सद्गुरू करून देतात.

आपल्यावरच आपली सत्ता स्थापित करणे हा योग आहे. बहिर्मुख मनास आता ओढून आतील बहुमूल्य अशी आत्मवस्तू आनंदाने समर्पित करणे ही ती दुर्मिळ संधी सद्गुरू कृपेनेच शक्य होते. जसे जगातील वस्तू वैभव गुरू मिळवून देतात तशीच जगाबाहेरील सत्ता सद्गुरू प्रदान करतात. आपापल्या बुध्दी व क्षमतेप्रमाणे आपण ती प्राप्त करून घेतो.... हेच जीवनाचे सार्थक आहे.

देह देवपाट हृदय संपुष्ट मध्ये गुरू मूर्ती बैसविली..
प्रेमाचं हे पाणी प्रक्षाळिले तुज आत्मस्वरूपे सद्गुरू राज....
भाव केला गंध भक्तीच्या अक्षता वाहिल्या अच्युता श्रीगुरूशी....
मन केला मोगरा चित्त केली शेवंती स्वत्वाच्या तुळशी अर्पियेल्या...
जाळुन क्रोध दीप उजळोनी ज्ञान दीप ओवाळू स्वरूप अविनाश....
त्रिगुणात्मक वाण केले समर्पण इच्छेसि भोजन अर्पियेले...
तुका म्हणे सेवा देवाभावे एका पंचप्राण सखा गुरुराव..
जानकी जीवन स्मरण जय जय राम
भगवंत हृदयस्थ आहे.

॥ अध्यात्म ॥

अपर्णा परांजपे
पुणे मो. 95030 45495

मूल मराठी लेखक-सचिन वसंत पाटील हिन्दी भावानुवाद-डॉ. मीना श्रीवास्तव

मेहनत की रोटी

आगे.....
विनायक का लगाया आंकड़ा कभी-कभी सही नहीं बैठता था। इस हार के ग़म को भुलाने हेतु वह खूब छककर शराब पीता था और कभी कभार नंबर लग जाने पर जश्न मनाने के लिए भी शराब ही पीता था। मतलब यह कि, शराब उसके हर मर्ज की दवा थी। अधिकतर मौकों पर उसका आंकड़ा ठीक बैठता नहीं था। फिर पिछले दिन की हार की भरपाई करने हेतु वह दोबारा ही नहीं बल्कि बारम्बार खेलता और उतनी ही बार हारता। आंकड़ों के मायाजाल ने उसे पूरी तरह अपनी गिरफ्त में ले लिया था।
घरवाली उसके व्यवहार से बेहद तंग आ चुकी थी। बच्चे बेचैन और व्याकुल थे। कौन जाने उनकी सुचारु रूप से चलती सुन्दर गृहस्थी को किस मनहूस की नजर लग गई थी। कुछ ही दिनों में, काम से गए हुए एक बेकार, व्यसनी शराबी के रूप में उसकी बदनामी पूरे गाँव में फैल गई। कोई भी उसे अपने जूतों के पास तक फटकने नहीं देता था।
बीच-बीच में कभी कभार जब उसे होश आता, तो वह काम ढूंढने लगता। लेकिन एक पक्के शराबी और जुआरी आदमी को कौन काम देगा? जिसकी फूटी कौड़ी की भी आमदनी न हो, और तो और, जिसके मटके का और दारू का खर्चा सर पर चढ़ा हो!
आखिरकार, उसने अपना खुद का घर बेचने का फैसला किया। सोचा, रहेंगे किसी सस्ते किराये के घर में या फिर गांव के बाहर की झोपड़पट्टी में। परन्तु यहाँ भी उसकी किस्मत रूठी हुई थी। घर बेचने में कई दिक्कतें आने लगीं। उसके चचेरे चचा ने होशियारी दिखाते हुए खेत के साथ साथ उसका घर तक अपने नाम करवा लिया था।
एक दिन उसके चचेरे चचा ने उसे घर से भगा दिया। उसने विनायक को धमकाते हुए कहा, "यह घर मेरा है। फिर कभी इस घर में कदम रखने की हिम्मत की, तो टाँग तोड़ कर रख दूंगा"; ऐसा कहते हुए उसके टूटे फूटे बर्तन बाहर फेंक दिए। अब तो विनायक बीवी-बच्चों समेत सड़क पर आ गया। उसने इस पर विरोध जताने की कोशिश की, लेकिन उसकी ताकत काफी कम थी। अपने चचेरे चचा के खिलाफ अदालत में मुकदमा दायर करना जरुरी था। लेकिन उसके पास पैसे थे ही नहीं। गांव का सरपंच भी चचा के पक्ष में हो गया था। ग्रामसेवक ('ग्राम विकास अधिकारी') भी उसकी बात तक सुनने को तैयार नहीं था। उसे गांव का कोई आदमी दरवाजे पर खड़े रहने नहीं दे रहा था। भला एक शराबी की बात कौन सुनता? कोर्ट कचहरी के चक्कर लगाने के लिए पैसा नहीं, ऊपर से अदालती मामले में बहुत समय लगना तय था। क्रमश.....





नाट्यगीत संध्या कार्यक्रमाने रसिकवर्ग मंत्रमुग्ध

स्मिता सोहोनी दिनेश जोशी सुलभा पुंड विश्वास काळे छाया पालकर

ज्योतिर्मय साहित्य

छ. संभाजीनगर – प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थे तर्फे सभासदांच्या नाट्यगीतांचा कार्यक्रम ''नाट्यगीत संध्या'' वि. वि. चिपळूणकर सभागृह, गीता भवन येथे गुरुवार ०५-०२-२०२६ रोजी संपन्न झाला. अध्यक्ष श्रीकांत पत्की यांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले.

उपाध्यक्ष शैलजा देशपांडे, रमेश कुलकर्णी, स्मिता कुलकर्णी, मीरा पत्की, इंदु अरोरा, विनीता कलबुर्गे, रोहिणी कुलकर्णी, अनुराधा सुभेदार, शैला मोहनपूरकर, प्रमोद सुरडकर, देवेंद्र श्रीवास्तव, दत्तात्रय कुलकर्णी जयंत बडवे, अविनाश आचार्य, तसेच संस्थेचे सभासद, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन विश्वास काळे यांचे होते. भरत कुलकर्णी व वंदना देशमुख यांनी निवेदन केले. केदार बहिरगावकर व विश्वास काळे यांनी तबल्यावर तर नेहा कुलकर्णी व कृष्णा फडके यांनी हार्मोनियम वर साथ संगत केली. गोविंद कंडारकर यांनी टाळवाद्य व अशोक पाध्ये यांनी ध्वनि व्यवस्था सांभाळली. सचिव प्रेमचंद तुल्ले, कोषाध्यक्ष प्रमोद बेंडे, सूर्यकांत कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सुरुवात वाद्यसंगीत (धून) पंचतूंड नररुंड मालधर ने झाली. त्यानंतर नमन नटवरा विस्मयकारा ही नांदी कोरस ने सादर केली. खालील कलाकारांनी नाट्य गीते सादर केली.

१ जय गंगे भागीरथी – कृष्णा फडके. २ राधाधर मधु मिलिंद – प्रमोद तोरवी. ३ गर्द सभोवती रानसाजणी – छाया पालकर. ४ काटा रुते कुणाला – मिलिंद भालेराव. ५ नारायणा रमा रमणा – दिनेश जोशी. ६ वद जाउ कुणाला शरण – वीणा म्हैसेकर

७ नको विसरु संकेत मिलनाचा – प्रमोद पाटील

८ निघाले आज तिकडच्या घरी – विद्या औसेकर

९ मलयगिरिचा चंदन गन्धित धूप तुला लाविला – प्रकाश गायकवाड आणि सहकारी १० सजना का धरिला परदेस – स्मिता सोहोनी ११ उगवला चंद्र पुनवेचा – निशिगंधा महाजन १२ नरवर कृष्णास मान – सुलभा पुंडे. १३ देह देवाचे मंदीर – विश्वास काळे आणि सहकारी. १४ भैरवी – सजल नयन ऋतुधार बरसती (कोरस).

स्मिता सोहोनी, सुलभा पुंडे, विद्या औसेकर, दिनेश जोशी, विश्वास काळे यांच्या गीतांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

आजचा सभासदांच्या नाट्य गीतांचा कार्यक्रम खूपच जबरदस्त छान झाला.

गाण्याची निवड, ड्रेसिंग, स्टेज डेकोरेशन, निवेदन, सर्वच अप्रतिम होतं.

पत्की सरांच्या कार्य काळातील कार्यक्रमाचा आणखी एक मानाचा तुरा छान खोवला गेला.

सर्वांचीच गाणी, चेहऱ्यावरचे एक्सप्रेशन, सूर –ताल –लय, ड्रेसिंग मेकअप अतिशय छान.

काळे सरांनी सर्वांचीच तयारी छान करून घेतली.

केदार बहिर्गावकर व विश्वास काळे यांचा तबल्याचा ठेका तर अतिशय छान होता, तसेच नेहा कुलकर्णी व कृष्णा फडके यांची हार्मोनियमची साथ सुद्धा उत्कृष्ट होती.

भरतजी आणि वंदना दोघांच्याही निवेदनाने बहार आणली.

जास्त अलंकारिक भाषा न वापरता साधं सोपं, सहज गत्या आणि आटोपशील झालेलं निवेदन मनाला भावलं.

पाध्ये सरांनी नेहमी प्रमाणे ध्वनी व्यवस्था छान सांभाळली.

पत्की सर, कार्यकारणी, काळे सर आणि सर्वांचेच मनापासून अभिनंदन.

अनुराधा सुभेदार

आजचा नाट्य गीतांचा कार्यक्रम अंत्यंत दर्जेदार व अप्रतिम झाला. या कार्यक्रमातील सहभागी कलावंत, त्यांची वेशभूषा, रंगभूषा, नाट्यगीतास अनुकुल हावभाव, अदाकारी सारं कसं अपूर्व होतं. त्याच तोडीची कलावंतांना लाभलेली संगीत साथ आणि नाट्यकलेचे खरे उपासक व जाणकार सर्वश्री भरतराव कुलकर्णी आणि वंदना देशमुख यांचे सहजसुंदर व लिलया निवेदन कार्यक्रमाची रंगत वाढविणारे ठरले. आजच्या नाट्य गीतांचा या बहारदार कार्यक्रमाने सर्व नाट्य रसिक भारावून गेले होते. आज खर्या अर्थाने गीता भवन येथील चिपळूणकर सरांच्या नावाने असलेला रंगमंच श्रीमंत झाल्याचा साक्षात्कार झाला.संस्थेचे अध्यक्ष श्रीमान पत्की सरांच्या सुवर्ण काळातील आजचा हा नाट्य गीतांचा नजराणा सर्वांच्या सदैव संस्मरणीय भेट म्हणून स्मरणात राहील. सर्व सहभागी कलावंत व निवेदक यांचे मनस्वी अभिनंदन !!!

प्रमोद सुरडकर.

काल गीता भवनच्या रंगमंचाने रसिक प्रेक्षकांना अक्षरशः मधूर नाट्यगीतांची मेजवानी दिली .हिंदी भाषिक असूनही उठी उठी गोपाळा या मराठी गाण्यावर तर उगवला चंद्र पुनवेचा हे अनेक हरकती असलेल्या शास्त्रीय गीतावर निशिगंधा महाजनांनी टाळ्या घेतल्या.सुंदर वेशभूषेसह स्मिता सोहनींनी का धरिला परदेस वर वन्स मोअर घेतला तर नरवर कृष्णा समान चे अप्रतिम सादरीकरण वन्स मोअर घेतला नसता तर नवल !! एकूणच कार्यक्रम दर्जेदार झाला व गीता भवनच्या रंगमंचाने आणखी एक नवीन टप्पा गाठला असे अभिमानाने म्हणावेसे वाटते, सर्व कलाकारांचे मनापासून अभिनंदन

प्रमोद गौरकर

सांग कधी कळणार तुला

ज्योतिर्मय साहित्य

१९६९ मधे एक मराठी चित्रपट आला होता,त्याचे नाव आहे अपराध. जुन्या काळातील ब्लॅक अँड व्हाईट असा तो सिनेमा होता.

सिनेमाचे निर्माते होते, शरद पिळगावकर, आणि दिग्दर्शक होते राजदत्त.. त्या सिनेमामधे मुख्य भूमिकेत, रमेश देव, सीमा देव, राजा परांजपे, इंद्राणी मुखर्जी, बाळ कोल्हटकर अशी अनेक मातब्बर मंडळी होती.

त्यात एक अतिशय सुंदर गाणं होतं. आजही तेवढंच लोकप्रिय आहे. आणि त्या गाण्याचे बोल होते, सांग कधी कळणार तुला? गायक, गायिका अनुक्रमे महेंद्र कपूर आणि सुमन कल्याणपूर हे होते, संगीत दिले होते, एन दत्ता यांनी. आणि गीतकार होते मधुसूदन कालेलकर. रमेश देव म्हणजे सिनेमातील श्याम दातार हे आकाशवाणी मधे गायक असतात आणि वसुधा म्हणजे सीमा देव या एका दवाखान्यात नर्स असतात. एकदा श्याम आजारी पडतात आणि दवाखान्यात दाखल होतात. आणि नर्स वसुधा श्यामची काळजीपूर्वक सेवा करतात. अगदी मनोभावे आणि हळूहळू दोघे एकमेकांच्या प्रेम बंधनात अडकतात.

मनोरंजन

गिरीश वसेकर(देशपांडे)
नांदेड सिटी,पुणे ९४२२६५९४००

पण वसुधाचे संसारा विषयी स्वप्ने म्हणजे एअर कंडीशन,गाडी,बंगला ही भौतिक सुखे आणि प्राप्त परिस्थितीत ते सारं श्याम यांना शक्य नसते. खरंच का हे एवढे आवश्यक आहे?भौतिक सूखे महत्वाची की एक प्रेमळ व्यक्ती, हा विचार करण्या सारखा विषय बनतो. आणि याच दोघांवर म्हणजे रमेश देव आणि सीमा देव यांच्यावर चित्रित झालेले ते अजरामर असलेले, सुंदर प्रेमगीत म्हणजे,

सांग कधी कळणार तुला
भाव माझ्या मनातला
रंग कधी दिसणार तुला
लाजणाऱ्या फुलातला
गंधित नाजुक पाण्यामधूनी
सूर छेडिले अलगद कुणी
अर्थ कधी कळणार तुला
धुंदणाऱ्या सुरातला
निळसर चंचल पाण्यावरती
लयीत एक तरंग उठती
छंद कधी कळणार तुला
नाचणाऱ्या जलातला
जुळता डोळे एक वेळी
धीट पापणी झुकली खाली
खेळ कधी कळणार तुला
दोन वेड्या जीवातला

असं हे अतिशय सुंदर गाणे आहे मला खुप आवडतं.सारखं गुणगुणत राहावंस वाटतं.

हो अगदी कोणत्याही वयात आणि कोणालाही गुणगुणावे वाटावे, असेच हे गाणे आहे.

पिंपरी चिंचवडमधील पत्रकारांची अजित पवार यांना श्रद्धांजली

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली विमान अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. शोक व्यक्त करण्यासाठी आणि दादांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून पिंपरी चिंचवड शहरातील पत्रकारांनी आज थेरगाव येथील लक्ष्मीबाई बारणे उद्यानात शोकसभा घेतली. अजितदादा पवारांच्या कर्तृत्वाचे स्मरण राहावे म्हणून १४ रोपांचे वृक्षारोपण करून आदरांजली अर्पण केली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत नेते अजितदादा पवार यांचे पिंपरी चिंचवड शहरावर नितांत प्रेम होते. त्यांनी शहराचा दैदिप्यमान विकास केला. त्यांच्या असे अकाली जाण्याने शहरावर शोककळा पसरली. शहराच्या १४ प्रमाणे आणि जिल्ह्यातील १४ तालुके असे प्रतिकात्मक साम्य लक्षात घेता दादांचे स्मरण व्हावे म्हणून १४ रोपांचे वृक्षारोपण उपस्थित पत्रकारांच्या हस्ते करण्यात आले. शोकसभेला अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न, पिंपरी चिंचवड पत्रकार संघ आणि डिजिटल मिडिया परिषद पिंपरी चिंचवड चे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. यामध्ये गणेश मोकाशी (महाराष्ट्र उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद), चिराग फुलसुंदर (जिल्हा संघटक) अनिल वडघुले (अध्यक्ष, पिंपरी चिंचवड पत्रकार संघ) विनय सोनवणे (अध्यक्ष, डिजिटल मिडिया परिषद पिंपरी चिंचवड) सागर सूर्यवंशी (सचिव) संतोष गोतावळे (उपाध्यक्ष) सिद्धांत चौधरी (सदस्य), हनुमंत रामदासी (सदस्य) संजीव सूर्यवंशी (सदस्य) रमेश साठे (सदस्य) इत्यादी पत्रकार उपस्थित होते.

वाचक घडविण्यात ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्वाची-डॉ. प्रतिमा इंगोले

ज्योतिर्मय साहित्य

अकोला – वाचक घडविण्यात ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्वाची असून, त्यासाठी चळवळ उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार डॉ. प्रतिमा इंगोले यांनी अकोट येथे केले.

जिल्हा ग्रंथोत्सवाचा शुभारंभ अकोट येथे सांस्कृतिक कलाभवनात झाला, त्यावेळी अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. उद्घाटनापूर्वी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. दिंडीचे उद्घाटन व ग्रंथ पूजन अकोट शहराच्या नगराध्यक्ष माया धुळे यांच्या हस्ते झाले. साहित्यिक नरेंद्र इंगळे, अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे,माजी सभापती दादासाहेब खोटरे आदी उपस्थित होते.

शुभारंभाला उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, मुख्याधिकारी शशिकांत बाबर, सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य सुरेशदादा खोटरे,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे डॉ. गजानन कोठेवार डॉ. एस आर बाहेती उपस्थित होते.

डॉ. इंगोले म्हणाल्या की, लेखक समाजाचे सुख-दुःख लेखनातून मांडत असतो. साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. ग्रंथालयांनी चळवळ उभारून साहित्य घराघरांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी केले.

अनेक मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले. मनोज देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. कलावंत हर्षदा इंदाने यांनी मला जिजाऊ व्हायचं हा एकपात्री प्रयोग सादर केला. 'मराठी भाषेपुढील आव्हाने' व सोशल मीडियावरील परिसंवादही झाला. परिसंवादाचे संचालन राजेश डांगटे यांनी केले प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी अतुल वानखडे यांनी केले

शीख परंपरेतील शस्त्रसंस्कृती : धर्म, शौर्य आणि सेवाभावाचा उत्सव

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर करण्यात आले होते. नागपूर आणि नांदेड येथे अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समन्वय समिती आणि शीख सिकलीगर, बंजार, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव संप्रदाय समुदायाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविक राज्य, देशभरातून आले होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत गुरू तेग बहादुर यांचा शौर्याचा इतिहास पोहाचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमात प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात विविध शस्त्र, नऊ समुदायात वापरण्यात येणाऱ्या वस्तु, ग्रंथ, गुरू नानक यांची माहिती आणि नऊ समुदायाचे गुरूंशी असलेले नाते त्यांचा इतिहास या प्रदर्शनाच्या माध्यमातून मांडण्यात आला. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

शीख उत्सव हा केवळ धार्मिक विधी नसून, ते शिख इतिहास, तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्यांचा सामूहिक उत्सव आहे. या उत्सवांमध्ये कीर्तन, लंगर, सेवा यांसोबतच शिख समुदायाची शस्त्रसंस्कृती विशेषतः अधोरेखित होते. तलवार, कृपाण, चक्र, भाला यासारखी ऐतिहासिक शस्त्रे ही शिख परंपरेत केवळ युद्धसाधने नसून, ती धर्मरक्षण, आत्मसन्मान आणि मानवतेच्या सेवेसाठी सज्ज राहण्याची प्रतीके आहेत.

शीख धर्मात शस्त्रसंस्कृतीचा उद्गम

शीख धर्माचे संस्थापक श्री गुरु नानक देवजी यांनी शांतता, समता आणि सत्य यांचा संदेश दिला. मात्र समाजातील वाढते अन्याय, अत्याचार आणि छळ पाहता पुढील गुरूंनी संरक्षणासाठी शस्त्रधारणेचा मार्ग स्वीकारला. सहावे गुरु श्री गुरु हरगोबिंद साहिब यांनी 'मिरीपीरी' संकल्पना मांडून आध्यात्मिकतेबरोबरच सामाजिक न्यायाची जबाबदारी स्वीकारली. याच काळात शिख समाजात शस्त्रसंस्कृतीचा औपचारिक आरंभ झाला.

शस्त्र म्हणजे आक्रमण नव्हे, तर संरक्षण

शीख परंपरेत शस्त्र उचलणे म्हणजे आक्रमण नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहणे होय. शस्त्रधारणा ही नैतिक जबाबदारी आहे. निरपराधांचे रक्षण करणे, अत्याचार थांबवणे आणि धर्मस्वातंत्र्य टिकवणे होय. ही भूमिका शीख धर्माला इतर धर्मांपेक्षा वेगळी आणि अधिक मूल्याधिष्ठित बनवते.

ऐतिहासिक शस्त्रे आणि त्यांचे प्रतीकात्मक अर्थ

शीख उत्सवांमध्ये प्रदर्शित केली जाणारी ऐतिहासिक शस्त्रे त्यांच्या प्रतीकात्मक अर्थामुळे विशेष महत्त्वाची ठरतात. तेग (तलवार) : अन्यायाचा प्रतिकार आणि धैर्य, कृपाण : न्याय, करुणा आणि संरक्षण, चक्र (चक्रम) : सज्जता, शिस्त आणि युद्धकौशल्य, भाला/बर्छा : जागरूकता आणि सामूहिक सुरक्षा, धनुष्य-बाण : संयम आणि अचूकता, या शस्त्रांचा उपयोग करताना नैतिकता आणि संयम पाळणे ही शीख परंपरेची खास ओळख आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब : शस्त्रांपलीकडील शौर्य

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिब यांनी शस्त्रांचा उपयोग न करता, बलिदानाच्या शौर्याने धर्मस्वातंत्र्याचे रक्षण केले. त्यांच्या नावातील 'तेग' ही तलवार नसून, न्यायासाठी उचललेली नैतिक धार होती. त्यांच्या शहादतीमुळे शीख शस्त्रसंस्कृतीला नैतिक अधिष्ठान मिळाले.

खालसा पंथ आणि शस्त्रसंस्कृतीचा उत्सवी आविष्कार

१६९९ मध्ये श्री गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली. यानंतर शस्त्रधारणा ही शीख ओळखीचा अविभाज्य भाग बनली. पंच ककारांपैकी कृपाण हे केवळ शस्त्र नसून, ते सदाचार, सेवा आणि सज्जतेचे प्रतीक आहे. शिख उत्सवांमध्ये निहंग शस्त्रप्रदर्शन, गटका (शस्त्रकला) प्रात्यक्षिके, शस्त्रांची पूजा व सन्मान, या माध्यमातून परंपरा जिवंत ठेवली जाते.

शस्त्रसंस्कृती आणि सेवाभाव

शीख शस्त्रपरंपरा सेवाभावाशी घट्ट जोडलेली आहे. 'देग तेग फतेह' हा मंत्र याच तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे. देग (लंगर, सेवा) आणि तेग (संरक्षण) या दोन्हींचा समतोल म्हणजेच शिख जीवनदृष्टी होय.

आजच्या काळातील शीख उत्सव आणि संदेश

आजच्या शांततामय समाजात शस्त्रांचा प्रत्यक्ष उपयोग मर्यादित असला, तरी शीख उत्सवांमधील शस्त्रसंस्कृती ही स्वाभिमानाची जाणीव करून देते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची प्रेरणा देते. शांतता ही सामर्थ्यावर आधारित असते, हे अधोरेखित करते. शीख उत्सवांमध्ये शस्त्रांचे दर्शन हे केवळ ऐतिहासिक स्मरण नसून, ते शौर्य आणि सेवाभावाचा उत्सव आहे. शीख शस्त्रसंस्कृती आपल्याला शिकवते की शक्ती ही विध्वंसासाठी नव्हे, तर न्याय, संरक्षण आणि मानवतेच्या सेवेसाठी असावी.

संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559